स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड,
ज्ञानतीर्थ, विष्णुपूरी, नांदेड

मानव विद्याशाखा अंतर्गत

भूगोल विषयातील पीएच.डी. पदवी करिता संशोधनाचा आराखडा

‘‘बार्शी तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचा भौगोलिक अभ्यास’’

संशोधक

प्रा.पैकेकर एस.बी.

एम.ए. बी.एड्.

सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग,

श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी

मार्गदर्शक

डॉ.नागरगोजे ए.यू.

एम.ए. बी.एड्. सेट पीएच.डी.

सहाय्यक प्राध्यापक भूगोल विभाग,

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

संशोधन केंद्र :

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर ता. उदगीर जि. लातूर

मे, २०१९

''बार्शी तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचा भौगोलिक अभ्यास''

प्रस्तावना :

मानव हा समाजप्रिय प्राणी आहे म्हणून तो समुदायाने राहतो. मानव ज्या ठिकाणी राहतो त्या ठिकाणी निवारा (घर) करतो. गरजेनुसार हा निवारा तात्पुरता किंवा कायम स्वरुपाचा असतो. निवाऱ्याची रचना साधी किंवा विशेष स्वरुपाची असते. अशी अनेक घरे एका विशिष्ठ पध्दतीनुरुप बांधलेली असतात. ही अनेक घरे एकत्र बांधली गेल्यास वस्तीची निर्मिती होते.

जगात मानव वसाहतीचा आरंभ फार प्राचीन काळापासून झाला. भूतलावर मानव प्राणी जन्मास आल्यावर मानवी वसाहतीला प्रारंभ झाला असे म्हणतात. सुरुवातीला अगदी प्राथमिक अवस्थेत शिकार व फळे, कंदमुळे गोळा करुन आपले जीवन व्यतीत करित होता. त्यावेळी तो झाडे, झुडूपे, झाडांच्या ढोली, गुहांतून राहत असे. त्यानंतर मानव पशुपालनाचा व्यवसाय करु लागला. त्यावेळी तो प्राण्यांच्या कातडयापासून बनविलेले तंबू तयार करुन त्यात राहू लागला. परंतू गुरांच्या चाऱ्याकरीता किंवा पाण्याकरीता त्याला सतत भटकावे लागे. त्यामुळे तो कायम स्वरुपाची वस्ती करुन राहत नसे. पण त्यानंतर तो शेती करु लागला. तेव्हापासून तो स्थायिक झाला शेतीजवळ त्याला कायम स्वरुपाची वस्ती करुन राहणे भाग पडले. तो साधी घरे बांधून राहू लागला. त्यातूनच ग्रामीण वस्तीचा उदय झाला. एकाच ठिकाणी राहून मानव आपल्या मूलभूत गरजांची पूर्तता करु लागला. कृषि विकासाबरोबर घरांच्या रचनेत संख्येत बदल घडून आला. मानव समुहाने राहू लागला सामाजिक संघटन झाल्याने ग्रामीण वस्तीचा विकास झाला.

साहित्याचे पुनरावलोकन :

बार्शी तालुक्यातील ग्रामीण वस्तीचा अभ्यास करण्यासाठी ग्रामीण वस्तीचा उदय, वाढ, विकास व उत्क्रांती यांचा परस्पराशी असणारा संबंध अभ्यासलेला आहे. जमिनीचा चढ-उतार, पाणीपरवठा, जमिनीचे स्वरुप आणि इतर सामाजिक घटक यांचा वस्तीच्या उदय,विकास व उत्क्रांतीवर प्रत्यक्ष प्रभाव पडलेला दिसून येतो. याशिवाय वस्तीचा प्रकार,आकार,अंतर रचना आणि पर्यावरणाशी असलेला संबंध व वस्तीचे कार्य यांचा परस्परांशी असलेल्या संबंधाचा संशोधनात्मक अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आलेला आहे.

मानवी संस्कृतीचा मूर्त अविष्कार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वस्त्यामधील वैविध्यपूर्ण घटक परस्परावलंबी व गतिशील असतात. सेंपल या विदुषीने केलेल्या भूगोलशास्त्राच्या व्याख्येप्रमाणे मानव हा गतिशील घटक आणि वस्ती ही मानवी संस्कृतीचे वैशिष्टयपूर्ण प्रतिक आहे. पृथ्वीचे भौगोलिक व्यक्तिमत्व अस्थिर असल्यामुळे वस्ती स्थल-कालानुरुप बदलत असते. सांस्कृतिक भूदृष्य म्हणून वस्त्यांचे अस्तित्वामुळे संपूर्ण प्रदेशाला प्रवर्तन मिळते. वस्त्यांच्या विकास प्रक्रियेनंतर प्रदेशांचा विकास आकार घेऊ लागतो. हडसन या शास्त्रज्ञाने वस्त्यांना सजीवांची उपमा दिली आहे. ग्रामीण वस्तीचा संशोधनात्मक अभ्यास अनेक वर्षापासून वैश्विक, देश, राज्य व स्थानिक पातळीवर करण्यात येत आहे. याची संक्षिप्त माहिती खालील प्रमाणे आहे.

श्री. रुडबर्ग एस. (१९५७) यांनी ग्रामीण वस्तीचा संशोधनात्मक अभ्यास करुन ग्रामीण वस्तीचे वितरण फक्त नैसर्गिक घटकावरुन निश्चित होत नाही तर वस्तीच्या वितरणावर इतर घटकांचा सुध्दा परिणाम होतो असे स्पष्ट केले आहे.

श्री बॉयलुंड इ. (१९५६) यांनी ग्रामीण वस्तीच्या संशोधनात्मक अभ्यासावरुन आणि निरीक्षणावरुन चांगली मृदा असलेल्या प्रदेशामध्ये सधन वस्तीची स्थापना झाली असल्याचे स्पष्ट केले आहे.

गोपाल कृष्ण आणि चंदना (१९७७) यांनी रेशन दुकान, शाळा, पोस्ट कार्यालय, डिस्पेंसरी आणि पशुवैद्यकीय सेवा यांच्या आधारे ग्रामीण सेवा केंद्राचा अभ्यास केला आहे.

श्री कनकुरे के.बी. (१९८६) यांनी मराठवाड्यातील ग्रामीण आणि नागरी वस्तीचा संशोधनात्मक अभ्यास केला आहे. या संशोधन अभ्यासामध्ये मराठवाड्यातील वस्तीच्या उत्क्रांतीपासून ते १९८६ पर्यंत वस्तीमध्ये झालेल्या परिवर्तनाचे विश्लेषण केले आहे. त्याचबरोबर मराठवाड्यातील वस्तीच्या प्रादेशिक असमतोल विकासाचे विश्लेषण केले आहे.

अभ्यासक्षेत्र :

बार्शी तालुका हा महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्याचा एक भाग आहे. तो जिल्ह्याच्या ईशान्य दिशेस स्थित आहे. बार्शी तालुक्यातील अक्षवृत्तीय विस्तार १८°१५'४९'' उ अक्षवृत्त ते १८°४०'०'' उ अक्षवृत्तापर्यंत तर रेखावृत्तीय विस्तार ७२°२१'३९'' पू रेखावृत्त ते ७२°४५'१०'' पूर्व रेखावृत्तापर्यंत आहे. बार्शी तालुक्यातील समुद्रसपाटीपासूनची सर्वाधिक उंची ७२३ मीटर असून सर्वात कमी उंची ४४२ आहे. बार्शी तालुक्याला नैऋत्य दिशेकडून सोलापूर जिल्ह्यातील माढा, मोहाळ, व सोलापूर तालुक्याच्या सीमा लाभलेल्या आहेत. इतर बाजुंनी उस्मानाबाद जिल्ह्याच्या सीमांनी वेढलेले आहे. बार्शी तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १५५३.९१ चौ. कि. मी. असून त्यामध्ये ९ मंडले व १३९ गावांचा समावेश आहे.

उद्दिष्टे :

बार्शी तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचा अभ्यास खालील उद्दिष्टांना अनुसरुन केला जाणार आहे.

१. बार्शी तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांच्या उत्क्रांतीचा ऐतिहासिक आढावा घेणे.

२. बार्शी तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांच्या वितरणाचा अभ्यास करणे.

३. बार्शी तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांच्या अंतराचा व आकाराचा लोकसंख्येला अनुसरुन अभ्यास करणे.

४. बार्शी तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांच्या वाढीचे विश्लेषण करणे.

५. बार्शी तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांच्या स्थानांचा अभ्यास करणे.

६. बार्शी तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांच्या प्रकाराचा व प्रारुपांचा अभ्यास करणे.

७. बार्शी तालुक्यातील लोकसंख्येची वाढ व लोकसंख्येची घनता यांचा अभ्यास करणे.

८. अभ्यासक्षेत्रातील ग्रामीण वस्तीतील घर बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या बांधकामाच्या सामुग्रीचे विश्लेषण करणे.

९. अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वस्त्यांची कार्ये अभ्यासणे.

१०. अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वस्तीतील सेवा-सुविधांचा अभ्यास करणे.

गृहितके :

१. ग्रामीण वस्तीची उत्पत्ती अनुकूल नैसर्गिक साधनसंपत्तीची उपलब्धता असलेल्या ठिकाणी होत असते.

२. ग्रामीण वस्तीचा आकार आणि ग्रामीण वस्तीमधील अंतर सर्व ठिकाणी सारखे नसते

३. ग्रामीण वस्तीची वाढ सर्व ठिकाणी सारखी होत नाही. वस्तीची वाढ नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांच्या अनुकूलतेवर अवलंबून असते.

४. ग्रामीण वस्त्यांचे प्रकार आणि प्रारुप सर्व ठिकाणी सारखे आढळत नाहीत.

५. ग्रामीण सेवा केंद्राचे वितरण असमान प्रमाणात आढळते.

माहिती संकलन :

या संशोधनासाठी वापरण्यात येणार असलेली आधार सामुग्री प्राथमिक व दुय्यम स्वरुपातील असून प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी सर्वेक्षण, मुलाखत प्रश्नांचा उपयोग करण्यात येणार आहे. ग्रामीण वस्त्यांच्या अंतर्गत रचनेचा अभ्यास निवडक गावांना भेटी देऊन करण्यात येणार आहे. दुय्यम स्वरुपाची माहिती मिळविण्यासाठी सोलापूर जिल्ह्याचा जनगणना अहवाल, सोलापूर जिल्ह्याचे सामाजिक व आर्थिक समालोचन, कृषी अहवाल, विविध संशोधन पत्रिका, सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, विविध संदर्भ ग्रंथ, भारतीय स्थलदर्शक नकाशे, गुगल अर्थ वेबसाईट, जी.आय.एस. व जी.पी.एस. प्रणालींचा आधार घेण्यात येणार आहे.

संशोधन पध्दती :

ग्रामीण वस्तीच्या अभ्यासासाठी गोळा केलेल्या आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी खालील सांख्यिकी पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

१) ग्रामीण वस्त्यांतील अंतर काढण्यासाठी खालील सूत्राचा आधार घेण्यात येणार आहे.

$$D = \sqrt{\frac{A}{N}}$$

D= सरासरी अंतर

A= एकूण क्षेत्रफळ

N= वस्त्यांची संख्या

२) ग्रामीण वस्त्यांची घनता काढण्यासाठी खालील सूत्रांचा वापर करण्यात येणार आहे.

$$DRS = \frac{\text{एकूण ग्रामीण वस्त्यांची संख्या}}{\text{एकूण ग्रामीण क्षेत्र}} \times 100$$

DRS = ग्रामीण वस्त्यांची घनता

३) ग्रामीण लोकसंख्येची सरासरी काढण्यासाठी खालील सांख्यिकी सूत्राचा वापर करण्यात येणार आहे.

$$S = \frac{P}{N}$$

S = ग्रामीण लोकसंख्येची सरासरी

P = ग्रामीण लोकसंख्या

N = ग्रामीण वस्त्यांची संख्या

४) Rn मूल्य काढण्यासाठी क्लार्क आणि ईवान्स यांच्या सांख्यिकी पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

$$Rn = 2d\sqrt{\frac{N}{A}}$$

Rn = निकट शेजारी विश्लेषण

Rn = अभ्यासक्षेत्रातील निरीक्षण केलेल्या निकट शेजारी बिंदूतील सरासरी अंतर

N = वस्त्यांची संख्या

A = तालुक्याचे क्षेत्रफळ चौरस किलोमीटरमध्ये

५) ग्रामीण वस्त्यांचे प्रकार ओळखण्यासाठी प्रकीर्णन सूचीचा वापर करण्यात येणार आहे.

$$\text{प्रकिर्णन सूची} = \frac{\text{वस्तीच्या सरासरी लोकसंख्येचा आकार}}{\text{वस्तीचे सरासरी अंतर}}$$

अ) $$\text{वस्तीच्या सरासरी लोकख्येचा आकार} = \frac{\text{एकूण ग्रामीण लोकसंख्या}}{\text{एकूण वस्ती}}$$

ब) $$\text{सरासरी अंतरण} = \frac{\text{एकूण क्षेत्रफळ चौरस किलोमीटर}}{\text{एकूण वस्ती}}$$

६) ग्रामीण सेवासुविधांची क्षमता काढण्यासाठी खालील सूत्राचा वापर केला आहे.

$$Xie = \frac{Pi}{mp}$$

Xie = सेवा सुविधांची अपेक्षित सख्या

Pi = एकूण ग्रामीण लोकसंख्या

mp = प्रति एक सेवासुविधावर अवलंबून असलेली लोकसंख्या

$$mp = \frac{P}{Fi}$$

P = एकूण लोकसंख्या

Fi = प्रत्येक एक सुविधांची एकूण संख्या

प्रकरण योजना

प्रकरण १. प्रस्तावना

१. अभ्यास क्षेत्र व विषय निवड

२. उद्दिष्टये

३. गृहितके

४. अभ्यास पध्दती

प्रकरण २. भौगोलिक, सामाजिक आणि आर्थिक स्थिती

अ) प्राकृतिक स्थिती

१. प्राकृतिक रचना

२. हवामान

३. मृदा

४. वनस्पती

ब) सामाजिक व आर्थिक स्थिती

१. भूमी उपयोग

२. कृषि

३. जलसिंचन

४. उद्योग

५. वाहतुक

६. लोकसंख्या

प्रकरण ३ ग्रामीण वस्त्यांची उत्क्रांती

१. ग्रामीण वस्त्याची उत्पत्ती

२. आर्यकालिन वस्ती

३. बुध्दकालिन वस्ती

४. प्राचीन काळातील वस्ती

५. मध्ययुगीन वस्ती

६. स्वातंत्र्योत्तर काळातील वस्ती

प्रकरण ४ ग्रामीण वस्त्यांचे अभिक्षेत्रीय वितरण

१. अभ्यास पध्दती

२. उताराची स्थिती व वस्तीचे वितरण

३. नदी खोरे व वस्तीचे वितरण

४. पर्जन्य विचलन व वस्तीचे वितरण

५. कृषि भूमि उपयोजन व वस्तीचे वितरण

प्रकरण ५ ग्रामीण वस्तीच्या वाढीचे प्रारुप

१. ग्रामीण वस्त्यांची संख्यात्मक वाढ

२. तहसिलनुसार ग्रामीण वस्त्याची वाढ

३. खेडयाच्या वैयक्तिक वाढीचे स्वरुप

प्रकरण ६ ग्रामीण वस्तीचे स्थान व स्थिती

१. नदी किनारी वस्त्या

२. धरणा शेजारील वस्त्या

३. डोंगर उतारावरील वस्त्या

४. आर्थिक व सांस्कृतिक स्थिती

**प्रकरण ७	ग्रामीण वस्त्यांचे प्रकार**

१.	अभ्यास पध्दती

२.	ग्रामीण वस्त्याचे प्रादेशिक वितरण

**प्रकरण ८	ग्रामीण वस्त्याचे प्रारुप**

१.	प्रस्तावना

२.	अभ्यास पध्दती

३.	खेड्याच्या प्रारुपाचे प्रादेशिक विश्लेषण

**प्रकरण ९	घरांचे प्रकार व बांधकाम साहित्य**

१.	घरांचे प्रकार

२.	घरांची घनता

३.	बांधकाम साहित्य

**प्रकरण १०	ग्रामीण सेवा केंद्र**

१.	अभ्यास पध्दती

२.	कार्ये

३.	केंद्रीयता

४.	सेवा केंद्राचा पदानुक्रम

**प्रकरण ११	निष्कर्ष**

संदर्भ ग्रंथ :

1) डॉ. माजित हुसेन-मानवी भूगोल, के. सागर पब्लिकेशन, पुणे

2) भारतीय स्थलदर्शक नकाशा

3) भागवत, अ. वि. (१९८८) : अधिवास भूगोल, नरेंद्र प्रकाशन, पुणे

4) पेंडसे, एस.डी. (१९६५) : महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे

5) संकालीया, एच.डी. (१९७९) : महाराष्ट्रातील मानव, प्रकाशक कुलकर्णी बी.

6) सामाजिक व आर्थिक समालोचन २००३-०४

7) Ahmad, E (1952) : Rural Settlement Type in the Uttar Pradesh, Annals, A.A. of Association of American Geography, Vol. No. 42, Pp. 223-246.

8) Baden-Powell B.H. (1892) : Land System of British India, Vol. I London

9) Gopal Krishna and Chandan M.M. (1977) : The System of Service Centres in the outer Himalayas, Published in Man, Culture and Settlement, (edited by) Rob ert C, Singh K.N. and Rana P.B. New Delhi.

10) Deshpande, C.D. (1942) : Settlement Types of Bombay, Karnataka, The Indian Geographical Journal.Vol. 17

11) Demangeon, A. (1962) : The Origin and Causes of Settlements, Types (eds.) P.L. Wagner and M. Mikessel, Reading in Cultural Geography, Chicago.

12) Desai, P.A. (1985) : Special Aspects of Settlement Patterns a Study of the Narmada Command Area, Mahesana District, Gujarat, Concept Publishing Company, New Delhi.

13) Dickinson R.E. (1932) 'The Distribution and Function of the Smaller Urban Settlements of East India, Geography Vol. XVII

14) Green, F.M.W. (1950) : Urban Hinterland in England and Walves, A Analysis of Bus Service. The Geographical Journal.

15) Hudson, F.S. (1976) : A Geography of Settlement, Second Education, Macdonald and Evans.

16) Kankure, K.B. (1986) : Marathwada : A study in Settlements Geography, Unpublished Ph.D. Thesis.

17) Kingsley Davis (1966) : Urban Research Method, New Delhi.

18) Kumbar, A.P. (1988) : 'A Study of Rural Habitat in Nira Valley, Ph.D. Thesis Shivaji University, Kolhapur.

संशोधक

प्रा.पैकेकर एस.बी.

सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग,
श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी

मार्गदर्शक

डॉ.नागरगोजे ए.यू.

सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग,
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर